Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

**प्राधिकृत प्रकाशन**

वर्ष ८, अंक १७ ] गुरूवार ते बुधवार, एप्रिल २८-मे ४, २०२२/वैशाख ८-१४, शके १९४४ [पृष्ठे ५, किंमत : रुपये १०.००

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग एक–अमरावती विभागीय पुरवणी

अनुक्रमणिका

| | पृष्ठे | | पृष्ठे |
|---|---|---|---|
| **भाग एक-शासकीय अधिसूचना :** नेमणुका, पदोन्नती, अनुपस्थितीची रजा (भाग एक-अ, चार–अ, चार-ब व चार–क यांमध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले नियम व आदेश. | नाही. | **भाग एक-अ.—**(भाग चार-ब यामध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम याअन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना. | १-१८ |
| **संकीर्ण अधिसूचना :** नेमणुका इ. इ., केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले नियम व आदेश. | १-५ | | |

## शासकीय अधिसूचना : नेमणुका, इत्यादी

नाही.

## संकीर्ण अधिसूचना : नेमणुका, इत्यादी

भाग १ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. २८५.

**जिल्हाधिकारी, यांजकडून**

**भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३.**

क्रमांक प्र.अ.-भू.सं.-अका-कावि-३४६-२०२२.—

ज्याअर्थी, समुचित शासन असलेल्या अमरावती जिल्ह्याच्या जिल्हाधिका-याने, भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश “ उक्त अधिनियम” असा करण्यात आला आहे) यांच्या कलम ११ च्या पोट-कलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, अधिसूचना क्रमांक ५७१-२१, दिनांक २७ ऑगस्ट २०२१ अन्वये प्रारंभिक अधिसूचना काढली आहे आणि त्याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूची-एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनीची, अनुसूची-दोन मध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे ;

आणि ज्याअर्थी, अमरावती जिल्ह्याच्या जिल्हाधिका-याने, कलम १५ च्या पोट-कलम (२) अन्वये दिलेला अहवाल, कोणताही असल्यास विचारात घेतल्यानंतर उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादित करण्याची आवश्यकता आहे याबाबत त्याची खात्री पटली आहे;

आणि म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोट-कलम (१) च्या तरतुदीन्वये उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे, असे याद्वारे घोषित करण्यात येत आहे ;

आणि ज्याअर्थी, अनुसूची-तीन मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधित कुटुंबियांच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी "पुनर्वसाहत क्षेत्र" म्हणून निर्धारित केले असल्याचे याद्वारे घोषित केले जात असून पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश अनुसूची-चारमध्ये विनिर्दिष्ट केला आहे.

आणि म्हणून, त्याअर्थी,उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिका-यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) अपर वर्धा प्रकल्प लाभक्षेत्र क्र. २, जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती यांस पदनिर्देशित करीत आहे.

## अनुसूची-एक

## संपादित करावयाच्या जमिनीचे वर्णन

भूसंपादन प्रकरण क्रमांक १-४७-२०१६-१७, गाव अंभोरी, ता. मोर्शी, जिल्हा अमरावती.

| अनुक्रमांक | सर्व्हे क्र. किंवा गट क्रमांक | अंदाजित क्षेत्र |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| | | हे. आर |
| १ | ३७/३ | ०.४० |
| २ | ३७/४ | ०.८१ |
| | एकूण क्षेत्र . . | १ २१ |

## अनुसूची-दोन

## सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण

प्रकल्पाचे नाव :— पाझर तलाव अंभोरी प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्राकरिता.

प्रकल्पाचे कार्याचे वर्णन :— पाझर तलाव अंभोरी प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्राकरिता.

सामाजिक मिळणारे लाभ :— पाझर तलाव अंभोरी प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्राच्या निर्मितीमुळे जवळपासच्या क्षेत्रात पाणीपातळीत वाढ होऊन सिंचनासाठी, पिण्यासाठी पाणी उपलब्ध होईल. तसेच मत्स्य व्यवसाय, पशुसंवर्धनामध्ये वाढ, कुटीर उद्योगास फायदा व रोजगार निर्मिती इत्यादी ग्रामीण पायाभूत सुविधा उपलब्ध झाल्यामुळे राष्ट्रीय उत्पन्नात भर पडून शेतक-यांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा होणार आहे.

## अनुसूची-तीन

## पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन

विस्थापन होत नसल्याने पुनर्वसाहतीची आवश्यकता नाही. सबब माहिती निरंक

## अनुसूची-चार

## पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश

सदर प्रकरणी घरे/कुटूंबे बाधित होत नाहित. सबब विस्थापन होत नसल्याने पुनर्वसनाची व पुनर्वसाहतीची (पुनर्स्थापनेची) आवश्यकता नाही.

अमरावती : **पवनीत कौर,**

दिनांक २९ मार्च २०२२. जिल्हाधिकारी, अमरावती.

भाग १ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. २८६.

**भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३.**

क्रमांक ७९/८७-लसिंका-२-२०२२.—

ज्याअर्थी, समुचित शासन असलेल्या यवतमाळ जिल्ह्याच्या जिल्हाधिका-यांनी, भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त अधिनियम" असा करण्यात आला आहे) यांच्या कलम ११ च्या पोट-कलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, अधिसूचना क्रमांक ७३-उजि(भूसं)-लसिंका-२-२०२२, दिनांक १५ एप्रिल २०२१ अन्वये प्रारंभिक अधिसूचना काढली आहे. त्याप्रमाणे शासन राजपत्रात दिनांक ६-५-२०२१ ते १२-५-२०२१ चे दरम्यान प्रसिद्ध झालेली आहे व शुद्धीपत्र दिनांक १२-४-२०२२ रोजी काढण्यात आले आहे. तसेच दैनिक लोकदूत मध्ये दिनांक २८-४-२०२१ रोजी व शुद्धीपत्रक १३-४-२०२२ रोजी आणि दैनिक मातृभूमि मध्ये दिनांक २९-४-२०२१ व शुद्धीपत्रक दिनांक १३-४-२०२२ रोजी प्रसिद्ध करण्यात आले आहे आणि त्याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूची-एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनीची, अनुसूची-दोनमध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे ; (सदर प्रकरणातील कलम ११ चे अधिसूचनेतील गट क्र. ५७/४ मधील ०.६६ हे. आर पैकी ०.५० हे. आर जमीन दिंडोरा बॅरेज मध्ये संपादित झाल्याने सुधारित संयुक्त मोजणी अहवालानुसार गट क्र. ०.६६ ऐवजी ०.१६ हे. आर करिता शुद्धीपत्रक प्रसिद्ध केले आहे);

आणि ज्याअर्थी, यवतमाळ जिल्ह्याच्या जिल्हाधिका-यांना, कलम १५ च्या पोट-कलम (२) अन्वये दिलेला अहवाल, कोणताही असल्याचे विचारात घेतल्यानंतर उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादित करण्याची आवश्यकता आहे याबाबत त्याची खात्री पटली आहे;

आणि म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोट-कलम (१) च्या तरतुदीन्वये उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे, असे याद्वारे घोषित करण्यात येत आहे ;

आणि ज्याअर्थी, अनुसूची-तीन मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधित कुटुंबियांच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी "पुनर्वसाहत क्षेत्र" म्हणून निर्धारित केले असल्याचे याद्वारे घोषित केले जात असून पुनर्वसन योजनेचा सारांश अनुसूची-चार मध्ये विनिर्दिष्ट केला आहे.

आणि म्हणून, त्याअर्थी,उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिका-यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), लघु सिंचन कामे क्र. २, यवतमाळ यांस पदनिर्देशित करीत आहे.

## अनुसूची-एक

## जमिनीचे वर्णन

भूसंपादन प्रकरण क्रमांक १३-४७-२०२०-२१, गाव कोची, ता. राळेगांव, जिल्हा यवतमाळ.

| अनुक्रमांक | भूमापन क्र. स.नं/गट क्र. | अंदाजित क्षेत्र |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| | | हे. आर |
| १ | ३८ | ० १६ |
| २ | ७१ | ० ४५ |
| ३ | ५४ | ० ६० |
| ४ | ५७/१ | ० ०७ |
| ५ | ५७/४ | ० १६ |
| ६ | ५७/५ | ० ०९ |
| ७ | ५७/१२ | ० २१ |
| ८ | ५७/१४ | ० ११ |
| | एकूण क्षेत्र . . | १ ८५ |

## अनुसूची-दोन

### सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण

प्रकल्पाचे नाव :– मुख्य कालवा सा. क्र. ८९७३० मी. वरुन उगमित कोसारा शाखा कालव्यावरील लघु कालव्याचे मातीकाम व बांधकामाकरिता मौजा कोची, ता. राळेगांव, जि. यवतमाळ.

प्रकल्पाचे कार्याचे वर्णन :– बेंबळा कालवा क्षेत्राकरिता.

सामाजिक मिळणारे लाभ :– मुख्य कालवा सा. क्र. ८९७३० मी. वरुन उगमित कोसारा शाखा कालव्यावरील लघु कालव्याचे मातीकाम व बांधकामामुळे राळेगांव तालुक्यातील जमिनीला ओलीताचा लाभ होणे अपेक्षित आहे.

## अनुसूची-तीन

### पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन

भूसंपादन प्रकरण क्रमांक १३-४७-२०२०-२१, गाव कोची, ता. राळेगांव, जिल्हा यवतमाळ.

| अनुक्रमांक | भूमापन क्र. स.नं/गट क्र. | अंदाजित क्षेत्र |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| | | हे. आर |
| १ | ३८ | ० १६ |
| २ | ७१ | ० ४५ |
| ३ | ५४ | ० ६० |
| ४ | ५७/१ | ० ०७ |
| ५ | ५७/४ | ० १६ |
| ६ | ५७/५ | ० ०९ |
| ७ | ५७/१२ | ० २१ |
| ८ | ५७/१४ | ० ११ |
| | एकूण क्षेत्र . . | १ ८५ |

## अनुसूची-चार

### पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश

-निरंक-

**टीप :-** उक्त जमिनीच्या आराखड्याचे उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) लघु सिंचन कामे क्र. २, यवतमाळ यांचे कार्यालयात, निरीक्षण करता येईल.

यवतमाळ :

दिनांक २१ एप्रिल २०२२.

**अमोल येडगे,**

जिल्हाधिकारी, यवतमाळ.

भाग १ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. २८७.

BY COMMISSIONER OF TEXTILES AND ADDITIONAL REGISTRAR, CO-OPERATIVE SOCIETIES

*NOTIFICATION*

No. SPM-D-6-Regn-1790-2022.---

Commissioner of Textiles and Additional Registrar, Co-operative Societies, State of Maharashtra, Nagpur hereby registered Vasudev Sahakari Sootgirni Ltd., Anjangaon Surji, District Amravati under Section 9*(1)* of the Maharashtra Co-operative Societies Act, 1960, (Maharashtra Act No. XXIV of 1961). The Registration number of the Society is No. NGP-PRG-(A)-CT-14 Dated 1st April 2022, and the same has been classified as “Processing Society” Sub Class “Agricultural Processing Society” under Section 12*(1)* of the said Act read with Rule 10*(1)* of the Maharashtra Co-operative Societies Rules, 1961.

SHEETAL TELI-UGALE (IAS),
Commissioner of Textiles
and Additional Registrar,
Co-operative Societies,
Maharashtra State,
Nagpur.

Nagpur :
Dated the 1st April 2022.

अ.-एक-२ (१५१५).

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.